नि.फौ.के. नं. ६१/२०२४
महाराष्ट्र शासन वि. अविनाश
निशाण क्र. २१

<u>**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०२ चा जबाब शपथेवर सुरु.**</u>

**नाव –** गणेश बळीराम भेरे,

**वय –** २६ वर्षे, **व्यवसाय** – निरंक,

**राहणार –** बोंडये, भेरेवाडी, ता. संगमेश्वर जि. रत्नागिरी.

<u>**अभियोगपक्षातर्फे सरतपास विशेष सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती गुरुपादगोळ यांचेकडून**</u> –

**०१.** दिनांक १३/०५/२०२४ रोजी मी माझ्या घरी हजर होतो. त्यादिवशी काय घटना घडली होती हे मला सांगता येणार नाही. असे काही घडले नाही की, त्यादिवशी मला दुखापत झाली होती व मी उपचाराकरीता दवाखान्यात गेलो होतो. असे काही घडले नाही की, त्यानंतर पोलीसांनी माझ्याकडे चौकशी करुन माझे तपासटिपण नोंदविले होते. मी आरोपीला ओळखतो. तो माझ्या गावचा रहीवाशी आहे.

***(साक्षीदार पूर्वीच्या जबानीशी विसंगत साक्ष देत असल्याने विशेष सहा. सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलटतपासाच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली, परवानगी मंजूर.)***

**०२.** हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १३/०५/२०२४ रोजी रात्री १०:३० च्या दम्यान यशवंत गुडेकर यांच्या अंगणात वाडीतील लोकांची मिटींग सुरु होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर मिटींगला मी, माझे भाऊ – विघ्नेश, आदित्य, चुलत भाऊ – दिपक व माझे वडील – बळीराम भेरे असे उपस्थीत होतो.

**०३.** *(साक्षीदारास त्याच्या <u>**तपासटिपणातील चिन्हांकित 'अ' कडील मजकुर**</u> वाचुन दाखविण्यात आला)*. सदरचा मजकुर बरोबर नाही. सदरचा मजकुर तसा का नमुद करण्यात आला आहे, हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी आरोपीने अश्लील शिवीगाळ केली होती. *(साक्षीदारास त्याच्या*

***<u>तपासटिपणातील चिन्हांकित 'ब' कडील मजकुर</u>*** *वाचुन दाखविण्यात आला).* सदरचा मजकुर बरोबर नाही. सदरचा मजकुर तसा का नमुद करण्यात आला आहे, हे मला सांगता येणार नाही.

**०४.** हे मला माहिती नाही की, माझा भाऊ – आदित्य याने अविनाश गुरव यांच्याविरुध्द पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, न्यायालयाबाहेर तडजोड होवुन आरोपीसोबतचा वाद आता मिटलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, तडजोड झाल्यामुळे आरोपीला वाचविण्यासाठी आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे. आरोपीला दाखविल्यास ओळखु शकते. आज रोजी आरोपी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास – आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञा श्रीमती यु. पी. चव्हाण यांनी नाकारला.</u>**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2026.02.06 17:51:44 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**
न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख,
जि. रत्नागिरी.

दिनांक ०६.०२.२०२६
स्थळः देवरुख

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date of decision | :- | 06/02/2026 |
| Evidence signed by PO. on | :- | 06/02/2026 |
| Evidence uploaded on | :- | 06/02/2026 |